मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेकडून मान्सूनपूर्व तयारीला वेग

## नाले सफाईत 92.33 टक्के प्रगती; पावसाळ्यापूर्वी कामे पूर्णत्वाच्या उंबरठ्यावर

**पिंपरी | प्रतिनिधी**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातील नाले सफाई मोहिमेला वेग आला असून, महापालिकेने हाती घेतलेल्या कामांपैकी तब्बल ९२.३३ टक्के काम पूर्ण झाले आहे. शहरात पावसाचे पाणी तुंबणे, साचलेला गाळ आणि स्थानिक पूरस्थिती टाळण्यासाठी प्रशासनाने यंदा नियोजनबद्ध आणि वेळबद्ध पद्धतीने मोहीम राबविल्याने नाले सफाईची कामे अंतिम टप्प्यात पोहोचली आहेत.



महापालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांमार्फत मार्च महिन्यापासून नाले सफाई मोहीम सुरू करण्यात आली होती. शहरातील एकूण १४१ नाले आणि ९४ हजार ९१३ मीटर लांबीच्या नाल्यांची साफसफाई हाती घेण्यात आली आहे. सुरुवातीला १६ मार्च रोजी केवळ ५.०४ टक्के प्रगती नोंदवली गेली होती. मात्र एप्रिल आणि मे महिन्यात कामांना गती देण्यात आल्याने २५ मेपर्यंत ८५.८४ टक्के काम पूर्ण झाले आणि १ जूनअखेर ही प्रगती ९२.३३ टक्क्यांवर पोहोचली आहे.

क्षेत्रीय कार्यालयनिहाय पाहता काही विभागांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. 'ग' क्षेत्रीय कार्यालयाने १०० टक्के नाले सफाई पूर्ण करत आघाडी घेतली असून, 'फ' विभागात ९९.६१ टक्के तर 'ई' विभागात ९८.४४ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित विभागांमधील साफसफाईची कामेही अंतिम टप्प्यात असून पावसाळा सुरू होण्यापूर्वी संपूर्ण शहरातील नाले स्वच्छ करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे.

दरवर्षी पावसाळ्यात नाल्यांमध्ये साचणारा गाळ, प्लास्टिक व इतर कचऱ्यामुळे पाण्याचा प्रवाह अडतो आणि अनेक भागांत पाणी तुंबण्याच्या घटना घडतात. काही ठिकाणी स्थानिक पूरस्थितीही निर्माण होते. ही बाब लक्षात घेऊन यंदा महापालिकेने नाले सफाईचे नियोजन अधिक काटेकोर केले असून, संवेदनशील आणि पाणी साचण्याची शक्यता असलेल्या भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, पावसाळ्यात नागरिकांना पाणी साचणे किंवा तुंबण्याच्या समस्यांना सामोरे जावे लागू नये, यासाठी नाले सफाईची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या कामांचा नियमित आढावा घेतला जात असून, निर्धारित मुदतीत आणि प्रभावी पद्धतीने कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे.

तर उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सांगितले की, नाले सफाईची कामे केवळ प्रमाणावर न पाहता गुणवत्तेच्या निकषांवरही तपासली जात आहेत. नाल्यांमधून काढलेला गाळ आणि कचरा तातडीने उचलून त्याची विल्हेवाट लावली जात आहे. तसेच पावसाळ्यात समस्या निर्माण होऊ शकणाऱ्या संवेदनशील भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

महापालिकेकडून सुरू असलेल्या या मोहिमेमुळे यंदाच्या पावसाळ्यात शहरातील महापालिकेकडून सुरू असलेल्या या व्यापक नाले सफाई मोहिमेमुळे यंदाच्या पावसाळ्यात शहरातील जलनिस्सारण व्यवस्था अधिक सक्षम आणि सुरळीत राहण्यास मदत होणार असून, पाणी तुंबणे व स्थानिक पूरस्थितीच्या घटनांमध्ये लक्षणीय घट होईल, असे महापालिका प्रशासनाने सांगितले आहे.

# पालकांच्या खिशाला कात्री; शालेय साहित्य महाग, स्टेशनरीच्या किमतीत 10 ते 15 टक्के वाढ...

## आखाती युद्ध व इंधन दरवाढीचा परिणाम, वह्या, पुस्तके, दप्तर, गणवेश आणि स्टेशनरीच्या दरात वाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

नवीन शैक्षणिक वर्ष अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले आहे. मात्र, यंदा बाजारात शालेय साहित्याचे दर प्रचंड कडाडल्याने पालकांच्या खिशाला मोठी कात्री लागली आहे. वाढत्या महागाईमुळे नवीन शैक्षणिक वर्षात पालकांवर मोठा आर्थिक भार वाढला आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या तोंडावर पालकांना अतिरिक्त भार सहन करावा लागणार आहे. आखाती युद्ध, इंधन दरवाढ आणि वाढलेल्या वाहतूक खर्चाचा परिणाम शालेय साहित्यावरील सवलतींवर झाला आहे. त्यामुळे शालेय साहित्यांच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. अभ्यासक्रमपूरक पुस्तके, सराव संच, वह्या, दप्तर, चित्रकला साहित्य, पेन-पेन्सिल यासह इतर स्टेशनरीच्या किमतीत १० ते १५ टक्क्यांनी वाढ झाल्याने पालकांच्या आर्थिक गणिते बिघडली आहेत.



बाजारपेठेत वही-पुस्तके, दप्तर, वॉटर बॉटल, कंपास पेटी, रंगपेटी आणि इतर शालेय स्टेशनरीच्या किमतीत यंदा १० ते १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेल्या वर्षी मिळणारे साहित्याचे संच यंदा अधिक महागले आहेत. कागदाच्या किमती वाढल्यामुळे वह्या आणि पुस्तकांच्या छापील किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. मुलांचे गणवेश आणि बूट यांच्या किमतीही वधारल्या आहेत. व्यापाऱ्यांच्या मते, आंतरराष्ट्रीय पातळीवरील आखाती युद्ध आणि त्यामुळे सातत्याने होणारी इंधन दरवाढ या महागाईला कारणीभूत आहे.

इंधनाचे दर वाढल्यामुळे वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. तसेच, कच्च्या मालाची टंचाई निर्माण झाल्याने उत्पादन खर्च वाढला असून, त्याचा थेट फटका किरकोळ बाजाराला बसत आहे. प्लास्टिक आणि स्टीलच्या वस्तूंच्या किमती वाढल्याने वॉटर बॉटल आणि डबे महाग झाले आहेत. एकीकडे शाळांचे वाढीव शुल्क आणि दुसरीकडे शालेय साहित्याचे वाढलेले दर यामुळे पालकांचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. दोन मुले असलेल्या पालकांना तर यंदा शैक्षणिक साहित्यासाठी दुप्पट खर्च करावा लागत आहे. "दरवर्षी शैक्षणिक खर्च वाढत चालला आहे, त्यात आता स्टेशनरीही महागल्याने घरखर्च चालवणे कठीण झाले आहे," अशी हतबलता पालकांनी व्यक्त केली आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच झालेल्या या दरवाढीमुळे पालकांमध्ये तीव्र चिंता पसरली आहे.

# बारा वर्षात लोकसभेतील चर्चेत सर्वाधिक सहभाग

## 96 टक्के उपस्थिती, रेल्वे, रस्ते, पर्यटनाला चालना; खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

खासदारकीच्या बारा वर्षांच्या कार्यकाळात मावळ लोकसभा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यावर भर दिला. रेल्वे, रस्त्यांची कामे मार्गी लावली. पर्यटनाला चालना देण्यासाठी विविध कामे केली. पाणीपुरवठा कामाला प्राधान्य दिले, निगडीपर्यंत मेट्रो मार्गिकेचे काम सुरू करण्यात यश आल्याचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले. लोकसभेत ९६ टक्के उपस्थित राहिलो असून चर्चेत सर्वाधिक सहभाग घेतला. पाचवेळा संसद रत्न, एकवेळा संसद महारत्न आणि दोनवेळा संसद उत्कृष्ट महारत्न पुरस्काराने सन्मानित झालो असल्याचे बारणे यांनी सांगितले.

खासदारकीच्या तिसऱ्या टर्ममधील दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्ताने आयोजित पत्रकार परिषदेत खासदार बारणे यांनी कामाचा लेखाजोखा मांडला. ते म्हणाले, १६, १७ व १८ व्या लोकसभेत २०१२ प्रश्न विचारलेले असून ५१३ चर्चांमध्ये सहभाग घेतला. ३६ खासगी सदस्य विधेयके सादर केली. लोकसभेतील उपस्थिती ९६ टक्के आहे. ऊर्जाविषयक लोकसभा स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून १२ अहवाल सादर केले. समितीच्या आतापर्यंत ३२ बैठका घेण्यात आल्या असून तीन अभ्यास दौरे यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

१६ वी, १७ वी व १८ वी लोकसभेतील सातत्यपूर्ण उत्कृष्ट संसदीय कामगिरीबद्दल प्राईम पॉईंट फाऊंडेशन यांच्या वतीने विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले. उत्कृष्ट संसदीय कार्याबद्दल पाचवेळा संसद रत्न पुरस्कार, एकवेळा संसद महारत्न आणि दोनवेळा संसद उत्कृष्ट महारत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. पिंपरी येथील पासपोर्ट सेवा केंद्राची एप्रिल २०१७ रोजी सुरवात केली. या केंद्रातून आजतागायत एक लाख ७१ हजार ८०७ नागरिकांनी पासपोर्ट काढले. क्रांतीवीर दामोदर हरी चापेकर यांच्या नावाने पोष्टाचे तिकीट काढले. चापेकर स्मारकासाठी राज्य सरकारकडून भरीव निधी आणला. देशातील सर्वात मोठे आंतरराष्ट्रीय विमानतळ पनवेल येथे पूर्णत्वास नेऊन त्याकामी पाठपुरावा केला. सतत पाठपुरावा करीत पिंपरी ते भक्ती शक्ती चौक, निगडी पर्यंत मेट्रोला मंजुरी घेतली. काम ५०% पूर्णत्वास आले असून ते लवकर पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. हिंजवडी ,वाकड, पिंपळे सौदागर ,भोसरी ते चाकण नवीन मेट्रो मार्गाचा डीपीआर तयार करण्यात आला आहे. गेली अनेक वर्ष रखडलेला नवी मुंबई ते खारघर पनवेल या मार्गावरील मेट्रोचे पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण करून मेट्रो सुरु केली. पिंपरी-चिंचवडचा स्मार्ट सिटीत समावेश केला.



### पाणी व नदीसुधार

» पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या पवना धरणात साठलेला गाळ लोकसहभागातून व स्वखर्चाने सातत्याने आठ वर्ष काढला. आतापर्यंत एक लाख क्युबिक मीटर गाळ काढला. त्यामुळे पाण्याच्या साठ्यात मोठी वाढ झाली. पवना व इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प डीपीआर तयार करून सदर प्रकल्प केंद्र व राज्य सरकारच्यावतीने तसेच पिंपरी-चिंचवड महापालिका व पीएमआरडीएच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पास मंजुरी मिळवली.

### रस्ते विषयक

» देहू ते पंढरपूर पालखी मार्गासाठी देहू ते देहूरोड चौक संरक्षण खात्याची जागा असल्याने पालखी मार्गाचे काम पूर्ण करण्यासाठी संरक्षण खात्याकडे पाठपुरावा सुरू आहे. पुणे-मुंबई महामार्गावर सिंहगड कॉलेज ते खालापूर मिसिंग लिंकच्या नवीन मार्गाला गती देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून घाटातील ट्रॅफिक जाम समस्या सोडवण्यात आली. प्रवाशांची वेळ, इंधनाची बचत झाली आहे. केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून पनवेल – उरण ते मुंबई समुद्र मार्गावर अटल सेतू हा देशातील पहिला २२.५ किलोमीटर लांबीचा समुद्र मार्गावरील पूल मावळ लोकसभा मतदारसंघात उभारला आहे. यामुळे पुणे-मुंबई प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या वेळेची बचत मोठ्या प्रमाणात झाली पनवेल ते उरण जे.एन.पी.टी. राष्ट्रीय महामार्ग आठ पदरी करून वाहतुकीची समस्या सोडवली . या रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी उडाणपूल उभारले.

# आर्थिक निकष पाहून विक्रम काकडेंना उमेदवारी; विलास लांडेंचा पक्षावर घणाघात

## विधान परिषद उमेदवारीवरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजित पवार गट) नाराजी उफाळून आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद उमेदवारीवरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजित पवार गट) नाराजी उफाळून आली आहे. भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांनी पक्षाच्या उमेदवारी निवडीच्या प्रक्रियेवर तीव्र नाराजी व्यक्त करत विक्रम काकडे यांना आर्थिक निकषांच्या आधारे उमेदवारी देण्यात आल्याचा आरोप केला आहे.

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना लांडे म्हणाले की, "पक्षातील अनेक वर्षे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलून आर्थिकदृष्ट्या सक्षम उमेदवाराला संधी देण्यात आली.हा निर्णय कार्यकर्त्यांच्या भावना दुखावणारा आहे." यावेळी त्यांनी पक्ष नेतृत्वावर अप्रत्यक्ष टीका करत, "आज अजितदादा असते तर त्यांनी पक्षासाठी आयुष्य घालवलेल्या कार्यकर्त्यांचा विचार केला असता. त्यांच्या पश्चात आम्ही हतबल झालो आहोत," अशी खंत व्यक्त केली.

विक्रम काकडे यांच्या उमेदवारीवर उपरोधिक भाष्य करताना लांडे म्हणाले , "पक्षाने त्यांना संधी दिली आहे, त्यामुळे भविष्यात पक्षाची ताकद नक्कीच वाढेल," असा टोला त्यांनी लगावला.

विशेष म्हणजे, विलास लांडे यांचा आज वाढदिवस असून विधान परिषद उमेदवारीच्या निमित्ताने पक्षाकडून 'बर्थडे गिफ्ट' मिळेल, अशी त्यांना अपेक्षा होती. मात्र उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांचा अपेक्षाभंग झाल्याचे त्यांच्या समर्थकांकडून बोलले जात आहे. दरम्यान, या घडामोडींमुळे पिंपरी-चिंचवडच्या राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले असून राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत नाराजी पुन्हा एकदा समोर आली आहे.



### कार्यकर्त्यांच्या योगदानाची दखल घेण्याची अपेक्षा

» पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या उमेदवारी प्रक्रियेनंतर भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांनी पक्षातील जुन्या आणि निष्ठावान कार्यकर्त्यांच्या योगदानाची दखल घेतली जावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. पक्षवाढीसाठी अनेक वर्षे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळणे हे संघटन बळकट करण्यासाठी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. उमेदवारी न मिळाल्याची खंत व्यक्त करतानाही पक्षाच्या भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांनी संघटनात्मक ताकद वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली. या भूमिकेमुळे कार्यकर्त्यांच्या भावना आणि त्यांची पक्षनिष्ठा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे.

# जनगणना 2027 बाबतच्या अफवांपासून सावध राहा; महापालिकेचे आवाहन

## अधिकृत प्रगणकांकडूनच एचएलओ ॲपद्वारे डिजिटल सर्वेक्षण सुरू, ओळखपत्र तपासूनच माहिती देण्याचे आवाहन.

**पुणे | प्रतिनिधी**

जनगणना २०२७ च्या सर्वेक्षणाबाबत समाजमाध्यमांवर सध्या दिशाभूल करणारे व्हिडिओ व्हायरल होत असून, नागरिकांनी यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन महापालिकेने केले आहे. जनगणनेचे काम पूर्णपणे पारदर्शक, डिजिटल पद्धतीने सुरू असून याबाबतच्या अपप्रचाराला, अफवांना बळी पडू नये, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. काही शालेय विद्यार्थिनी हातात फॉर्म आणि कागदपत्रे घेऊन घराघरांमध्ये जनगणना करत असल्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर जोरदार व्हायरल होत आहे.

हा व्हिडिओ पूर्णपणे चुकीचा, नागरिकांत संभ्रम निर्माण करणारा असल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. अशा कोणत्याही शालेय विद्यार्थिनींमार्फत किंवा कागदपत्रे गोळा करून ऑफलाईन कोणतेही सर्वेक्षण केले जात नसल्याचेही पालिकेने स्पष्ट केले आहे. पालिकेच्या माहितीनुसार, जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील कामाला १६ मे २०२६ पासून सुरुवात झाली असून, ते १४ जून २०२६ पर्यंत चालणार आहे.




### व्हायरल व्हिडिओबाबत महापालिकेचा खुलासा

**» जनगणना २०२७ संदर्भातील काही दिशाभूल करणारे व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत असून नागरिकांनी त्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन महापालिकेने केले आहे. काही शालेय विद्यार्थिनी घराघरांत जाऊन जनगणना करत असल्याचा व्हिडिओ प्रसारित होत असला तरी तो पूर्णपणे चुकीचा असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. अशा प्रकारे विद्यार्थ्यांमार्फत कोणतेही सर्वेक्षण केले जात नसून नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा हा प्रयत्न असल्याचे महापालिकेने म्हटले आहे. नागरिकांनी केवळ अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

हे संपूर्ण सर्वेक्षण पालिकेने नियुक्त केलेल्या अधिकृत प्रगणक शिक्षिकांमार्फतच केले जात आहे. यासाठी कोणत्याही कागदी फॉर्मचा वापर न करता, प्रगणक आणि पर्यवेक्षकांच्या माध्यमातून मोबाइलवरील अधिकृत एचएलओ ॲपद्वारे ऑनलाइन नोंदी केल्या जात आहेत. एका भागात एकूण १६४ घरांपैकी तब्बल १४० घरांचे सर्वेक्षण एचएलओ ॲपवर पूर्ण केले आहे. यावरून ही प्रक्रिया, सुरक्षितपणे डिजिटल स्वरूपात राबविली जात असल्याचे स्पष्ट होते.

आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकांचे ओळखपत्र नक्की तपासा. खात्री पटल्यानंतरच त्यांना योग्य ती माहिती द्यावी. घरांच्या यादीचे सर्वेक्षण करण्यासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे. अचूक जनगणना, सक्षम भारत हा संदेश देत पालिकेने नागरिकांना या राष्ट्रीय कार्यात सहभागी होण्याचे आणि अफवा पसरवण्यापासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.

### जनगणना पूर्णपणे डिजिटल पद्धतीने

**» महापालिकेच्या माहितीनुसार, जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील काम १६ मे २०२६ पासून सुरू झाले असून ते १४ जूनपर्यंत चालणार आहे. हे सर्वेक्षण पूर्णपणे डिजिटल पद्धतीने राबविले जात आहे. यासाठी कोणत्याही कागदी फॉर्मचा वापर होत नसून अधिकृत प्रगणक आणि पर्यवेक्षक मोबाइलवरील एचएलओ (HLO) ॲपच्या माध्यमातून माहिती नोंदवत आहेत. एका भागातील १६४ घरांपैकी १४० घरांचे सर्वेक्षण ॲपवर पूर्ण झाले आहे. त्यामुळे जनगणना प्रक्रिया पारदर्शक आणि सुरक्षित असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.**

### प्रगणकांचे ओळखपत्र तपासणे आवश्यक

**» जनगणना सर्वेक्षणासाठी घरी येणाऱ्या व्यक्तीचे अधिकृत ओळखपत्र तपासल्यानंतरच नागरिकांनी माहिती द्यावी, असे महापालिकेने सांगितले आहे. अधिकृत प्रगणकांकडूनच घरांची माहिती गोळा केली जात असून नागरिकांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. अचूक जनगणना ही विकास नियोजनाचा पाया असल्याने नागरिकांनी या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा. तसेच अफवा, अपप्रचार आणि दिशाभूल करणाऱ्या संदेशांपासून दूर राहून केवळ प्रशासनाच्या अधिकृत माहितीकडेच लक्ष द्यावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.**

# हिंजवडी आयटी पार्कला यंदा जलकोंडीपासून दिलासा; 90 टक्के उपाययोजना पूर्ण

## जलनिस्सारण कामांना गती; पावसाळ्यात रस्त्यांवर पाणी साचू नये यासाठी एमआयडीसीचे नियोजन.

**पुणे | प्रतिनिधी**

'सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल का, शाळेभोवती तळे साचून सुटी मिळेल का,' या बालगीताप्रमाणे हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कची गेल्या वर्षी पावसाळ्यात स्थिती झाली होती. आयटी कंपन्यांवर यंदा पावसाळ्यात कर्मचाऱ्यांना सुटी देण्याची वेळ येऊ नये, यासाठी एमआयडीसीने आयटी पार्कमध्ये मोठ्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत. त्यातील ९० टक्के कामे पूर्ण झाली असून यंदा आयटी पार्कमधील रस्ते जलमार्ग बनणार नाहीत याची दक्षता घेण्यात आली आहे.

यंदाच्या पावसाळ्यात हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कची जलकोंडी होऊ नये, यासाठी



उपाययोजनांना गती मिळाली आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) नालेसफाईसह नवीन सांडपाणी वाहिन्यांची कामे हाती घेतली आहेत. ही कामे ९० टक्के पूर्ण झाली असून, या पावसाळ्यात पाणी साचू नये, या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. याचबरोबर वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत. 'एमआयडीसी' तील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आयटी पार्कमध्ये पदपथांच्या खाली नाले आहेत. हे नाले अनेक ठिकाणी तुंबले होते. ते मोकळे करण्याचे काम 'एमआयडीसी' ने हाती घेतले आहे. हे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. त्यात आयटी पार्क टप्पा एकमध्ये ९ किलोमीटर नालेसफाई करण्यात आली. तसेच, टप्पा दोनमध्ये ७ किलोमीटर नाल्यांची सफाई करण्यात आली. टप्पा तीनमध्ये ८.५ किलोमीटर नालेसफाई करण्यात आली असून, २ हजार २०० मीटर लांबीच्या एका मोठ्या नाल्याचीही सफाई करण्यात आली.

आयटी पार्कमध्ये तीन ठिकाणी भुयारी सांडपाणी वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. रस्त्यांवर पावसाचे पाणी येऊ नये, यासाठी रस्त्यांच्या खालून या वाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. त्यात डोहलर चौक, एम्पोरिस कंपनी, प्राइम स्पेस कंपनी या ठिकाणांचा समावेश आहे. याचबरोबर विप्रो सर्कल येथेही सांडपाणी वाहिनीची सफाई करण्यात आली आहे.

### पाणी साचणार नाही

**» आयटी पार्कमधील पावसाळापूर्व कामे वेगाने सुरू आहेत. तसेच, पावसाळ्यात नाले तुंबल्यास तातडीने उपाययोजना करण्याची तयारीही करण्यात आली आहे. रस्त्यावर पाणी साचू नये, यासाठी काही ठिकाणी भुयारी सांडपाणी वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. यामुळे यंदा पावसाळ्यात आयटी पार्कमध्ये रस्त्यावर पाणी साचण्याची समस्या निर्माण होणार नाही, अशी माहिती एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता राजेंद्र तोतला यांनी दिली.**

# एकात्मिक उपचारपद्धती काळाची गरज, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांचे मत

## आयुर्वेद आणि ॲलोपॅथी या दोन्ही उपचारपद्धतींचे एकात्मीकरण होणे आवश्यक आहे,

**पुणे | प्रतिनिधी**

"आयुर्वेद क्षेत्रासाठी 'अच्छे दिन' आले असून, या उपचारपद्धतीच्या संशोधन व विकासाला राजाश्रय मिळत आहे. केंद्र सरकारने स्वतंत्र आयुष मंत्रालयाची स्थापना केल्याने आयुर्वेदाला संस्थात्मक बळ मिळाले. आरोग्यसेवा अधिक परिणामकारक आणि रुग्णकेंद्रित करण्यासाठी आयुर्वेद आणि ॲलोपॅथी या दोन्ही उपचारपद्धतींचे एकात्मीकरण होणे आवश्यक आहे,' असे मत गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी रविवारी व्यक्त केले.

रसायू लाइफ सायन्सेसच्या वास्तूचे उद्‌घाटन डॉ. सावंत यांच्या हस्ते करण्यात आले त्या वेळी ते बोलत होते. खासदार मेधा कुलकर्णी आणि रसायूचे संस्थापक योगेश बेंडाळे उपस्थित होते.

सावंत म्हणाले, 'आरोग्यसेवा अधिक परिणामकारक आणि रुग्णकेंद्रित करण्यासाठी आयुर्वेद आणि ॲलोपॅथी या दोन्ही उपचार पद्धतींचे एकात्मीकरण होणे ही काळाची गरज आहे. ॲलोपॅथीमधील काही औषधांच्या दुष्परिणामांचे व्यवस्थापन करण्यासाठी आयुर्वेदाची मदत घेतली जाते. त्यामुळे या दोन्ही वैद्यकीय पद्धतींचा समन्वय साधणे आवश्यक आहे. आयुर्वेदाच्या पदवीवर ॲलोपॅथीचे उपचार करावेत, असा आग्रह नाही; परंतु जोपर्यंत दोन्ही पद्धतींचे एकात्मीकरण होत नाही, तोपर्यंत रुग्णसेवा अपूर्णच राहील. २०१४ नंतर आयुर्वेदाच्या शिक्षण आणि संशोधन पद्धतीत मूलभूत बदल झाले आहेत. जागतिक आरोग्य संघटनेनेही आयुर्वेदासाठी जामनगर येथे विशेष केंद्र उभारले आहे, ही मोठी जमेची बाजू आहे.'

कुलकर्णी म्हणाल्या, 'आयुर्वेद केवळ छोट्या-मोठ्या आजारांवरच नव्हे, तर गंभीर आजारांवरही प्रभावीपणे काम करते. आयुर्वेदाला चांगले दिवस यावेत यासाठी राजकीय स्तरावरही सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.'

बेंडाळे म्हणाले, 'प्रत्येक व्यक्तीची प्रकृती वेगळी असते आणि त्यानुसार औषधोपचारही वेगळे असावे लागतात. ही क्षमता रसशास्त्रात आहे. आयुर्वेदाच्या छत्राखाली विविध उपचार पद्धतींचे एकात्मीकरण झाल्यास ते आरोग्यसेवा क्षेत्रासाठी दिशादर्शक ठरेल.'

विषारी दारूच्या घटनेवर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री प्रमोद सावंत म्हणाले, 'राज्य उत्पादनशुल्क विभागाने अशा घटनांवर कडक नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. गोव्यामध्ये अशा प्रकारच्या बेकायदा दारूविक्रीवर पूर्णपणे बंदी असून, तसे आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाते.'



### आयुष मंत्रालयामुळे आयुर्वेदाला नवे बळ

» केंद्र सरकारने स्वतंत्र आयुष मंत्रालयाची स्थापना केल्यानंतर आयुर्वेद क्षेत्राला मोठे संस्थात्मक बळ मिळाले आहे, असे मत गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी व्यक्त केले. २०१४ नंतर आयुर्वेद शिक्षण, संशोधन आणि विकासाच्या क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण बदल झाले असून संशोधनासाठी अधिक संधी उपलब्ध झाल्या आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने जामनगर येथे आयुर्वेदासाठी विशेष केंद्र उभारल्यामुळे या पारंपरिक उपचारपद्धतीला जागतिक स्तरावर मान्यता मिळत आहे. त्यामुळे आयुर्वेदाच्या विस्तारासाठी आणि आधुनिक आरोग्य व्यवस्थेत त्याच्या प्रभावी वापरासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे.

### आयुर्वेद-ॲलोपॅथी समन्वयाची गरज

» आरोग्यसेवा अधिक परिणामकारक आणि रुग्णकेंद्रित करण्यासाठी आयुर्वेद व ॲलोपॅथी या दोन्ही उपचारपद्धतींचे एकात्मीकरण आवश्यक असल्याचे डॉ. प्रमोद सावंत यांनी सांगितले. अनेकदा ॲलोपॅथी औषधांच्या दुष्परिणामांचे व्यवस्थापन करण्यासाठी आयुर्वेदाची मदत घेतली जाते. त्यामुळे दोन्ही पद्धतींचा समन्वय साधल्यास रुग्णांना अधिक व्यापक आणि प्रभावी उपचार मिळू शकतात. आयुर्वेदाच्या पदवीवर ॲलोपॅथी उपचार करण्याचा आग्रह नसला तरी रुग्णहितासाठी परस्परपूरक दृष्टिकोन स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### गंभीर आजारांवरही आयुर्वेद प्रभावी

» खासदार मेधा कुलकर्णी यांनी आयुर्वेद केवळ किरकोळ आजारांपुरता मर्यादित नसून अनेक गंभीर आजारांवरही प्रभावी ठरत असल्याचे सांगितले. रसायू लाइफ सायन्सेसचे संस्थापक योगेश बेंडाळे यांनी प्रत्येक व्यक्तीची प्रकृती वेगळी असल्याने उपचारपद्धतीही वैयक्तिक स्वरूपाची असणे गरजेचे असल्याचे नमूद केले. रसशास्त्र आणि आयुर्वेद यामध्ये ही क्षमता असल्याचे त्यांनी सांगितले. आयुर्वेदाच्या छत्राखाली विविध उपचारपद्धतींचे एकात्मीकरण झाल्यास आरोग्यसेवा क्षेत्राला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# पुण्यात उष्णतेचा कहर; जमिनीचे तापमान 58 अंशांवर पोहोचले

## शहरीकरणामुळे उपनगरांमध्ये उष्णता बेट परिणाम वाढला; नदीकाठ भाग तुलनेने थंड असल्याचा अभ्यासातून निष्कर्ष

**पुणे | प्रतिनिधी**

वाढत्या शहरीकरणामुळे पुणे शहराचा पृष्ठभाग प्रचंड तापत आहे. नदीपात्र असलेले जुने भाग तुलनेने कमी गरम होतात. मात्र, जेथे वाहन, लोकसंख्येची घनता आणि सिमेंटचे रस्ते जास्त असे भाग उष्णतेची बेटे बनली आहेत. जुन्या शहरापेक्षा उपनगरे जास्त उष्ण बनत आहेत. त्यामुळेच शहराच्या हवेचे तापमान 38 अंशांवर असले, तरी जमिनीचे तापमान तब्बल 58 अंशांवर गेले आहे. त्यामुळे एकूण उष्म्यात वाढ झाली आहे, असे संशोधन शहरातील बी. के. पी. एस. कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या प्रा. प्रज्ञा पत्की आणि प्रा. पराग गोवर्धन नारखेडे यांनी केले आहे.

गत काही वर्षांपासून पुणेकरांना उन्हाळा असह्य होत आहे. त्याचे कारण वाढते शहरीकरण हेच आहे. हवामान विभाग हा जमिनीपासून काही मीटर उंच असणाऱ्या हवेचे तापमान दररोज जाहीर करते. ते तापमान यंदा 41 ते 44 अंशांपर्यंत गेले होते. मात्र, प्रथमच शहराच्या पृष्ठभागाच्या तापमानाचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने प्रथमच या दोन संशोधकांनी मांडला आहे. 'शहरी उष्णता बेटाच्या परिणामाचा अभ्यास' असे या संशोधनाचे शीर्षक आहे.



### परिणाम आणि निरीक्षणे

» तापमानातील ही वाढ पुणे शहराच्या उपनगरांमध्ये विशेषत्वाने दिसून आली. जसजसे शहरीकरण वाढत जाईल, तसतसे शहरी उष्णता बेटाच्या प्रभावाची व्याप्ती आणि तीवता अधिक गंभीर होईल.

» वाढत्या शहरीकरणामुळे पृष्ठभागाच्या तापमानात सतत वाढ झाली आहे.

» शहरी पर्यावरणीय प्रणालीची रचना आणि कार्यामध्ये बदल होईल. ज्यामुळे शहरवासीयांच्या आरोग्यास हानी पोहचेल. रस्त्यांवरील वनस्पती, मानवनिर्मित आणि नैसर्गिक घटकांची उपस्थिती दर्शविणारी दृश्य रचना हे घटक पुणे शहरातील उष्ण बेटांवर प्रभाव टाकतात.

» इमारती, वाहने आणि उष्णता निर्माण करणारे, ती साठवून ठेवणारे मानवी उपक्रम वाढीव तापमानास कारणीभूत आहेत.